*पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मानले जिल्हयातील मतदारांचे आभार*
=======================================================

विधानसभा निवडणूकीसाठी मतदान करणा-या जिल्हयातील सर्व नागरिकांचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आभार व्यक्त केले आहे.

चंद्रपूर जिल्हा हा नेहमीच शांतताप्रिय व लोकशाहीची मुल्ये जपणारा जिल्हा म्हणून सुपरिचीत आहे. जिल्हयाचा हा लौकीक कायम ठेवत मतदार बंधू भगिनींनी शांततेच्या वातावरणात निवडणूक प्रक्रिया पार पाडली ही अतिशय महत्वाची व अभिमानाची बाब आहे. मतदान हा लोकशाहीने प्रत्येक नागरिकाला दिलेला घटनादत्त मौलीक अधिकार आहे. आपल्या अमुल्य मताच्या माध्यमातुन रचनात्मक कार्य करणारे, विकासाभिमुख सरकार स्थापन होण्यास मदत व्हावी यादृष्टीने जागरूकतेने नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला याकरिता मी या जिल्हयाचा पालकमंत्री या नात्याने त्यांचा आभारी आहे.

जिल्हयात गेल्या 5 वर्षात झालेला अभूतपूर्व विकास, राज्य सरकारची दमदार कामगिरी, अनेक लोकाभिमुख निर्णय हीच महायुतीची शक्ती आहे. या शक्तीच्या बळावरच तसेच मतदार बंधू भगिनींचे प्रेम, शुभेच्छा आणि सहकार्य यांच्या बळावर महायुतीचे सरकार पुन्हा सत्तारूढ होईल असा विश्वास सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला आहे.